पवित्र श्रावण मासारंभानिमित्त मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २१८। किंमत - ४ रू
संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.)
मंगळवार ०८/०९/२०२६ । पाने - ६

सिल्क फेस्टीव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

# मुंबईकडे कूच अटळ?- जरांगे



जालना (वृत्तसंस्थआ)

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज दहावा दिवस आहे. सरकार जाणूनबुजून हयगय आणि हलगर्जीपणा करत असल्याचा आरोप करत जरांगे यांनी मराठा समाजाचा रोष वाढत असल्याचं म्हटलं आहे. तसेच, सरकारने १२ तारखेपर्यंतचा वेळ दिला असून त्या दिवशी सर्व मराठ्यांनी अंतरवाली सराटीमध्ये यावं, असं आवाहन त्यांनी केलं आहे. मुंबईत एका जरी तरुणाचं रक्त निघाले तर १० मिनिटात महाराष्ट्र बंद झाला पाहिजे, असे म्हणत त्यांनी सरकारला थेट इशारा दिला.

मनोज जरांगे म्हणाले की, सरकार जाणून बुजून हयगय, हलगर्जीपणा करत आहे. मराठ्यांचा रोष वाढत आहे. मराठा संपवण्यासाठी जाणूनबुजून हलगर्जीपणा चालला आहे. आपण सरकारला १२ तारखेपर्यंतचा वेळ दिलाय. सगळ्या मंत्र्यांनी सांगितले होते, तुम्हाला उपोषणाची वेळ येणार नाही म्हणून. मार्च, फेब्रुवारीला प्रसाद लाड म्हटले होते, आम्हाला बोलवा. ते म्हणाले, फडणवीस मराठ्यांच्या मागण्या पूर्ण करतील. म्हणून लाड यांना बोलावले होते. एक वर्षात त्यांनी काही केले नाही.

शिंदे-फडणवीसांची ही मिलीभगत आहे. शिंदेंचे दोन मंत्री आणि दोन प्रवक्ते यांनी आंदोलन मोडीत काढीत असल्याची माहिती आम्हाला मिळाली. मुंबईकडे निघाल्यावर हल्ला करून फडणवींना बदनाम करण्याचा सरकारचा डाव आहे. बावनकुळे आणि त्याच्या माणसाचं पण तेच चालू आहे. दोन-तीन दिवस दोन-तीन पत्रकार साधे भेटले, त्याला सल्ले विचारत आहेत. मोडीत काढायचे त्यांनी सांगितले. मुंबईला गेल्यावर यांनी हल्ला केला तर समजायचं. मुंबईकडे जाताना अडवले नाही तर आपल्याला खरी माहिती मिळाली नव्हती, असं जरांगे म्हणाले.१२ तारखेला अंतरवाली सराटीमध्ये मोठ्या संख्येने मराठा समाजाने उपस्थित राहण्याचं आवाहनही त्यांनी केलं. १२ तारखेला सर्व मराठ्यांनी अंतरवालीमध्ये यायचे. सांगली, सोलापूर, पुणे, कोल्हापूर, सातारा, सिंधुदुर्ग, रायगड, मुंबई, नगर, नाशिक जिल्ह्यातील प्रत्येक गावागावातील मराठ्यांनी अंतरवालीमध्ये या. प्रत्यक्ष सगळ्यांनी या. आता आंदोलकांनी आले नाही तरी चालेल, पण १२ तारखेला या. १० लोक असले तरी मुंबईकडे जाणार, असं त्यांनी सांगितले.

# नगर परिषदेच्या वतीने विविध विकास कामांचे लोकार्पण



## संगमनेर शहरात सीसीटीव्हीची नजर वाढणार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर नगरपरिषदेच्या वतीने सोमवार दिनांक ७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता संगमनेर शहरांमध्ये विविध ठिकाणी सीसीटीव्हीचे शुभारंभ तसेच फूड कोर्ट चे उद्घाटन समारंभ काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात व सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णाताई मालपाणी यांच्या शुभहस्ते व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार सत्यजित तांबे यांच्या उपस्थितीमध्ये होणार असल्याची माहिती नगराध्यक्ष डॉ सौ मैथिलीताई तांबे यांनी दिली.

संगमनेर नगर परिषदेच्या वतीने होत असलेल्या विविध विकास कामांचे उद्घाटन व लोकार्पण कार्यक्रमाबाबत अधिक माहिती देताना नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे म्हणाल्या की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहर वैभवशाली शहर ठरले आहे. आ. सत्यजित तांबे यांच्या संकल्पनेतून संगमनेर शहरातील नागरिक व महिलांची सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही विविध ठिकाणी बसवण्यात आले आहे. त्याचबरोबर शहरातील नागरिकांसाठी फूड कोर्ट खाऊ गल्ली निर्माण करण्यात आली आहे याच प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णपणे पुतळा, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्मारक, संविधान स्मारक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे स्मारक याबाबतची माहिती सुद्धा नागरिकांना दिली जाणार आहे.

संगमनेर नगर परिषदेच्या वतीने सोमवार दिनांक ७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता त्रिमूर्ती चौक, जनता नगर कॉर्नर, संगमनेर बस स्थानक कॉर्नर, चावडी, तीन बत्ती चौक, चंद्रशेखर चौक व नगरपालिका कोर्ट इमारत या ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्यात आले आहे. त्याचे लोकार्पण





तसेच सह्याद्री कॉलेज जवळ, नेहरू गार्डन येथे फूड कोर्ट शुभारंभ करण्यात येणार आहे. यानंतर ५.३० वाजता संगमनेर नगरपालिकेच्या प्रांगणामध्ये श्री. थोरात, डॉ. तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कार्यक्रम होणार आहे. यावेळी आ. सत्यजित तांबे, सौ. दुर्गाताई तांबे, युवा काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. जयश्रीताई थोरात, सर्व माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, निखिल पापडेजा व विविध पक्षाचे व सामाजिक संघटनांचे प्रमुख पदाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये होणार आहे. या प्रसंगी नागरिक, महिला व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन उपनगराध्यक्ष नूरमोहम्मद शेख, सर्व विभागांचे सभापती, सर्व नगरसेवक नगरसेविका, व मुख्याधिकारी डॉ. दयानंद गोरे यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांसाठी आ. रोहित पवार रस्त्यावर

मुंबई (वृत्तसंस्थआ)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये सातत्याने होत असलेले कथित घोटाळे उघडकीस येत आहेत. यामुळे या परीक्षांची तयारी करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर आता अनेक प्रश्नचिन्ह उभे राहिले आहेत. अशातच या परीक्षा पारदर्शक पद्धतीने व्हाव्या, घोटाळे करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. यासह इतर मागण्यांसाठी आज (दि.७ सप्टेंबर रोजी) पुण्यात विद्यार्थ्यांनी आक्रोश मोर्चाचे आयोजन केले आहे. पुण्यात सकाळी १० वाजता ओंकारेश्वर मंदिर ते जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यान विद्यार्थ्यांनी आक्रोश मोर्चाचे आयोजन केले आहे. या मोर्चाला शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्ष, काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेसह विरोधी पक्षाने पाठींबा दिला आहे. अशातच शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार (ठेहळीं झुरी) हे देखील या मोर्च्यात सहभागी झाले आहेत. विद्यार्थ्यांचं भविष्य ठरवणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्येच भ्रष्टाचार होत असेल तर प्रश्न विचारायचे नाहीत का, यात कुठलं राजकारण आलं? विद्यार्थ्यांच्या मागण्या राजकीय मागण्या आहेत का? असा संतप्त सवाल आमदार रोहित पवारांनी केला.

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त ऑफर मिळतेय जबरदस्त !
FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

संगमनेर नगरपरिषद
विविध विकास कामांचे
लोकार्पण व भूमिपूजन
- शुभहस्ते -
लोकनेते बाळासाहेब थोरात
मा. सुवर्णाताई मालपाणी
- कार्यक्रमाचे अध्यक्ष -
मा. डॉ. सुधीर तांबे
- प्रमुख उपस्थिती -
आमदार सत्यजीत तांबे — सदस्य, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य
मा. सौ. दुर्गाताई तांबे — प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा
मा. डॉ. जयश्री थोरात — अध्यक्ष, एकविरा फाउंडेशन
मा. दिलीपराव पुंड — मा. नगराध्यक्ष
मा. विश्वासराव मुर्तडक — मा. नगराध्यक्ष
मा. कैलासराव लोणारी — मा. नगराध्यक्ष
मा. अरुणराव वाकचौरे — मा. नगराध्यक्ष
- आपले विनीत -
नुरमोहम्मद शेख — उपनगराध्यक्ष
डॉ. मैथिली तांबे — नगराध्यक्षा
दयानंद गोरे — मुख्याधिकारी
किशोर पवार — सभापती, सार्वजनिक बांधकाम समिती
डॉ. अनुराधा सातपुते — सभापती, शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक कार्य समिती
किशोर टोकसे — सभापती, स्वच्छता, वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य समिती
मुजीबखान पठाण — सभापती, पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती
सौ. सरोजना पगडाल — सभापती, महिला व बालकल्याण समिती
सौ. प्राची कवडे — उपसभापती, महिला व बालकल्याण समिती
सर्व सन्माननीय नगरसेवक - नगरसेविका अधिकारी व कर्मचारी वृंद
कार्यक्रम - सोमवार, दि. ०७ सप्टेंबर २०२६ रोजी सायं. ०५ वाजता.
ठिकाण - नगरपरिषद प्रांगण, संगमनेर

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# सुवर्ण व्यवसायासोबत समाजसेवेचीही झळाळी

## शिक्षण क्षेत्रातील योगदानाला दिली कौतुकाची दाद





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - विद्यार्थ्यांच्या आयुष्याला ज्ञान, संस्कार आणि यशाची दिशा देणाऱ्या शिक्षकांच्या कार्याला समाजाचा सलाम मिळावा, या उद्देशाने ओम मयूर ज्वेलर्स, संगमनेर यांच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून २३ गुणवंत शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या या पुरस्कार सोहळ्यामुळे शिक्षण क्षेत्रात कार्यरत गुरुजनांच्या योगदानाला विशेष अधोरेखित करण्यात आले.

सुवर्ण व्यवसायासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचा आदर्श ओम मयूर ज्वेलर्सने या उपक्रमातून घालून दिला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी तसेच ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना ज्ञानाची नवी दृष्टी देण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा यावेळी गुणवंत शिक्षक पुरस्काराने गौरव करण्यात आला.

ओम मयूर ज्वेलर्स हे सन २००१ पासून संगमनेरमध्ये कार्यरत असून, व्यवसायाबरोबरच सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन देण्याची परंपरा त्यांनी जोपासली आहे. त्याच सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय शिक्षक दिनाच्या या उपक्रमातून आला.

**कर्तृत्ववान गुरुजनांचा सन्मान-** या पुरस्काराने डॉ. सदानंद काशिनाथ डोंगरे, सुनील रखमाजी घुले, सखाराम मुंजाबापू खेमनर, शशांक विलास खाजे, सोनवणे होशीराम रामनाथ, भारती अशोक शिवबाळा, विश्वास प्रमोद कुलकर्णी, डॉ. गव्हाणे रखमाजी सोपान, ढोकरे रामदास देवराम, वाकचौरे अनिल भास्कर, वाकचौरे राजेश रामभाऊ यांचा गौरव करण्यात आला.

तसेच वाघ बाळासाहेब मकाजी, वाकचौरे संदीप बाळासाहेब, पिंगळे ज्ञानेश्वर रभाजी, कांबळे प्रदीप गोरक्षनाथ, जाधव कांचन रमाकांत, वेताळ शितल मोहन, दिघे अण्णासाहेब तुकाराम, देशमुख प्रमोद बबनराव, मुर्तडक बाळासाहेब दत्तात्रय, नवले विरेश, चव्हाणके जयश्री संपतराव आणि महाले अजय शिवाजी यांनाही गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

'गुरुजनांचा सन्मान म्हणजे ज्ञानपरंपरेचा सन्मान' शिक्षकांचा सन्मान हा केवळ एका व्यक्तीचा गौरव नसून, ज्ञानदान, संस्कार, सेवाभाव आणि त्यागाच्या परंपरेचा सन्मान आहे. शिक्षक विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, सामाजिक जाणीव, संस्कार आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करतात. त्यामुळे अशा कर्तृत्ववान शिक्षकांच्या कार्याची समाजाने दखल घेणे गरजेचे असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

ओम मयूर ज्वेलर्सच्या या उपक्रमामुळे संगमनेर परिसरातील शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. व्यवसायासोबत सामाजिक बांधिलकी आणि समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याची ही भूमिका निश्चितच आदर्शवत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमास ओम मयूर ज्वेलर्सचे संचालक महेश राम मयूर, संचालिका वैशाली महेश मयूर, मातोश्री मीना मयूर, सिंधूताई डहाळे, संचालक गणेश महेश मयूर, श्रेया महेश मयूर, व्यवस्थापक अजित आडकी, कर्मचारी तसेच ग्राहक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्यामल भालेराव यांनी केले. प्रस्तावना वैशाली मयूर यांनी केली, तर सविता पवार यांनी आभार मानले. सर्वांच्या सहकार्यामुळे हा पुरस्कार सोहळा उत्साहपूर्ण, भावनिक आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

# महाराष्ट्रात मान्सून ओसरला

## एल निनोच्या प्रभावामुळे पाऊस गायब

मुंबई (वृत्तसंस्था)

एल निनोच्या प्रभावामुळे महाराष्ट्रात मान्सूनचा जोर ओसरल्याचे चित्र आहे. सप्टेंबरचा पहिला आठवडा संपत आला तरी राज्यात अपेक्षित असा जोरदार पाऊस झालेला नाही. बहुतांश जिल्ह्यांमध्ये सध्या केवळ हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी पडत आहेत. सर्वदूर पाऊस नसल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढू लागली असून खरीप हंगामातील पिकांना पाण्याचा मोठा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सध्या राज्यात मोठी आणि प्रभावी हवामान यंत्रणा सक्रिय नाही. त्यामुळे येत्या काही दिवसांत हवामानात चढ-उतार कायम राहतील आणि उष्णता व दमटपणा वाढण्याची शक्यता आहे. विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यासाठी हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे. या भागात वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्याव्यतिरिक्त राज्यातील इतर कोणत्याही जिल्ह्याला सध्या कोणताही इशारा देण्यात आलेला नाही.कोकण विभागात मुंबई, ठाणे, पालघर, रायगड आणि रत्नागिरीमध्ये हलक्या सरी पडू शकतात, तर सिंधुदुर्गात मध्यम पावसाची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांत ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम पाऊस होऊ शकतो. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा आणि कोल्हापूरच्या घाटमाथ्यावर पाऊस पडेल, पण मैदानी भागात केवळ तुटपुंज्या सरींची शक्यता आहे.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव आणि लातूर या भागात हवामान मुख्यत्वे कोरडे आणि उष्ण राहील. हिंगोली आणि नांदेडमध्ये काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे.

# आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात मोठे योगदान - माजी मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांनी जुलमी ब्रिटिश सत्तेविरुद्ध पहिला लढा उभारला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात रामोशी समाजाने अत्यंत प्रामाणिक आणि एकनिष्ठतेने काम केले. प्रामाणिक एकनिष्ठ आणि लढवय्या असा हा रामोशी समाज आहे. आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात मोठे योगदान असल्याचे गौरव उद्गार काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा.महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

सायखिंडी फाटा व यशोधन कार्यालय मैदानावर राजे उमाजी नाईक जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित २३५ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, देवराम गुळवे, तानाजी शिरतार, खर्डे गुरुजी, रमेश गफले,सचिन गुळवे, सचिन बोऱ्हाडे,संजय चव्हाण, रोशन गोपने,श्रीराम पवार,प्रा.बाबा खरात, दिलीप जोशी, ज्ञानेश्वर राक्षे,साहेबराव गुळवे आदींसह युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले, ब्रिटिशांविरुद्ध पहिला लढा आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांनी उभारला. त्यानंतर १८५७ चे युद्ध झाले. त्यानंतर लोकमान्य टिळक युग व महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यानंतर मिळालेली राज्यघटना ही सर्वांना मोठी देण असून गोरगरिबांना मतदानाचा अधिकार मिळाला आहे. मात्र सध्या लोकशाही आणि राज्यघटना धोक्यामध्ये आहे. जाती धर्माच्या नावावर राजकारण केले जात असून धर्मा धर्मा मध्ये फूट पाडली जात आहे.

संगमनेर तालुका हा सततच्या विकास कामातून आपण राज्यात अग्रगण केला. सहकार, शिक्षण, आर्थिक संपन्नता, ग्रामीण विकास, व्यापार येथील चांगले वातावरण यामुळे संगमनेरचा देशात लौकिक वाढवला आहे. संगमनेर तालुक्यात राजकीय आदर्श संस्कृती आहे. सर्वांना सोबत घेऊन आपल्याला पुढे जायचे आहे. तालुक्याचा विकास व एकजूट आपल्याला जपायची असून सर्वांनी एकत्र रहा असे आवाहन त्यांनी केले.

तर देवराम गुळवे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर तालुका विकासातून पुढे नेला. सर्व समाजाला त्यांनी जपले. सर्वांना समान संधी दिली. कधीही भेदभाव केला नाही. मात्र काही लोक आता ब्रिटिशांची फोडा तोडा नीती वापरून समाजामध्ये भेद निर्माण करत आहे. आपल्यासाठी कोण काम करते आहे ते लक्षात घ्या असे ते म्हणाले.

# अकोलेतील ४८ गावांचा संवेदनशील क्षेत्रातील समावेश रद्द करा

## भंडारदरा धरणग्रस्त विस्थापित कृती समितीच्या बैठकीत निर्णय

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - पश्चिम घाटातील पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात (इको सेन्सिटिव्ह झोन) अहिल्यानगर जिल्ह्यातील ४८ गावांचा समावेश करण्यात आला असून, ही सर्व गावे अकोले तालुक्यातील आहेत. केंद्र सरकारने पश्चिम घाटातील सुमारे ५६ हजार ८२५.७ चौरस किलोमीटर क्षेत्र पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करण्यासाठी सातवी मसुदा अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. या अधिसूचनेत राज्यातील सात जिल्ह्यांतील २ हजार ५१५ गावांचा समावेश असून, त्यापैकी ४८ गावे अकोले तालुक्यातील आहेत.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर भंडारदरा धरणग्रस्त विस्थापित कृती समितीच्या वतीने भंडारदरा येथे बैठक घेण्यात आली. आमदार वैभवराव पिचड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत उपस्थित शेतकरी व ग्रामस्थांनी ४८ गावांचा संवेदनशील क्षेत्रात केलेला समावेश तातडीने रद्द करण्याची मागणी केली.

स्थानिकांना विश्वासात न घेता हा निर्णय कसा? असा सवाल उपस्थित करत शेतकऱ्यांनी या निर्णयाचा तीव्र निषेध केला. मसुदा अधिसूचनेवर दोन महिन्यांच्या कालावधीत हरकती मागविण्यात आल्या आहेत. मात्र, ही गावे संवेदनशील क्षेत्रात समाविष्ट करण्यामागील नेमके कारण प्रशासनाने स्पष्ट करावे, अशी मागणी बैठकीत करण्यात आली.

मुळात भंडारदरा धरणामुळे विस्थापित झालेल्या शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न अद्याप प्रलंबित आहेत. त्यातच एकापाठोपाठ एक जाचक अटी शेतकरी व गावकऱ्यांच्या माथी मारल्या जात असल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. घाटघर धरणग्रस्त शेतकऱ्यांचाही प्रश्न अद्याप मार्गी लागलेला नाही. त्यामुळे आता या निर्णयाविरोधात जनता गप्प बसणार नसून, येत्या काळात मोठे जनआंदोलन उभारले जाईल, असा इशारा भंडारदरा धरणग्रस्त विस्थापित कृती समितीने दिला.

शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या



अन्यथा मोठे जनआंदोलनाचा इशारा

भंडारदरा धरणग्रस्त विस्थापित शेतकऱ्यांच्या जमिनी वर्ग-२ मधून वर्ग-१ करण्यात याव्यात, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली. वर्ग-१ नसल्यामुळे शेतकऱ्यांना फार्मर आयडी मिळत नाही. परिणामी पीकविमा काढता येत नाही, राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्ज मिळण्यात अडचणी येतात तसेच पिकांसाठी खताची ऑनलाइन बुकिंग करतानाही अडथळे निर्माण होतात.

कर्जमाफीच्या प्रक्रियेतही फार्मर आयडी नसल्याने शेतकऱ्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण होत नसल्याच्या समस्या बैठकीत मांडण्यात आल्या. त्यामुळे धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनींचा वर्ग-२ मधून वर्ग-१ करण्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय अकोले तालुक्यातील ४८ गावांना संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करण्याचा निर्णय तातडीने रद्द करावा, कोणत्याही गावाला व शेतकऱ्यांना विश्वासात न घेता हा निर्णय का घेण्यात आला, याचा प्रशासनाने खुलासा करावा, अशा विविध मागण्या शेतकऱ्यांनी मांडल्या.

सरकारने या मागण्यांची दखल घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आगामी काळात तालुक्यात मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल, असा निर्धार बैठकीत करण्यात आला.

शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित

या बैठकीस जयराम इदे (आदिवासी सेवक), भरत घाणे, सुनील सारुकते, नरहरी इदे, मारुती बांडे, तुकाराम खाडे, चंदर बांडे, संतोष सोडनर, दत्ता ढगे, राजू मधे, दगडू पांढरे, बाजीराव सगभोर, पांडुरंग खाडे, मच्छिंद्र खाडे, सागर रोंगटे, भास्कर बुळे, अशोक उघडे यांच्यासह परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नमुना क्र. ६४ वर नगराध्यक्षांची स्वाक्षरी बंधनकारक नाही

## राज्यातील नगरपालिका व नगरपंचायतींसाठी एकसमान कार्यपद्धतीचा मार्ग मोकळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

मुंबई - नगरपालिकांच्या आर्थिक व्यवहारातील नमुना क्र. ६४ वर नगराध्यक्षांची स्वाक्षरी आवश्यक आहे की नाही, यावर गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या संभ्रमाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. २०१८ मध्ये करण्यात आलेल्या कायद्यातील दुरुस्तीमुळे नगराध्यक्षांचे वित्तीय नियंत्रणाशी संबंधित अधिकारच वगळण्यात आले असल्याने नमुना क्र. ६४ वर मुख्याधिकाऱ्यांसोबत नगराध्यक्षांची स्वाक्षरी घेणे बंधनकारक नसल्याचे राज्य शासनाने स्पष्ट केले आहे.

यासंदर्भात नगरविकास विभागाने नगरपालिका प्रशासन संचालनालयाला तातडीने निर्देश दिले असून, शासनाच्या या निर्णयामुळे राज्यातील सर्व नगरपालिका आणि नगरपंचायतींमध्ये नमुना क्र. ६४ बाबत एकसमान कार्यपद्धती लागू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

नगरपालिकांच्या दैनंदिन आर्थिक व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या नमुना क्र. ६४ संदर्भात राज्यातील विविध नगरपालिकांमध्ये वेगवेगळी कार्यपद्धती अवलंबली जात होती. काही ठिकाणी संबंधित बिलांवर मुख्याधिकारी आणि नगराध्यक्ष या दोघांच्याही स्वाक्षऱ्या घेतल्या जात होत्या, तर काही ठिकाणी केवळ मुख्याधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने बिलाची प्रक्रिया पूर्ण केली जात होती. त्यामुळे प्रशासनासह लोकप्रतिनिधींमध्येही संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते.

२०१३ मध्ये अधिसूचित करण्यात आलेल्या लेखा संहितेत नमुना क्र. ६४ वर मुख्याधिकाऱ्यांसोबत नगराध्यक्षांची स्वाक्षरी घेण्याची तरतूद करण्यात आली होती. त्यानंतर २०१५ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणेला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. या प्रकरणातील न्यायालयीन प्रक्रियेमुळे नमुना क्र. ६४ वरील स्वाक्षरीच्या अधिकाराबाबतचा संभ्रम अनेक वर्षे कायम राहिला.

दरम्यान, ३१ मार्च २०१८ रोजी महाराष्ट्र अधिनियमात करण्यात आलेल्या दुरुस्तीमुळे नगराध्यक्षांच्या वित्तीय नियंत्रणाशी संबंधित तरतुदीच वगळण्यात आल्या. त्यामुळे नगराध्यक्षांना संबंधित वित्तीय अधिकार उपलब्ध नसल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

या प्रकरणातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे १६ जुलै २०२६ रोजी उच्च न्यायालयाने संबंधित याचिका निकाली काढली. त्यामुळे यापूर्वी २०१६ मध्ये देण्यात आलेला स्थगिती आदेशही संपुष्टात आला आहे. परिणामी, सध्याच्या कायदेशीर स्थितीनुसार नमुना क्र. ६४ वर अंतिम स्वाक्षरी करण्याचा अधिकार केवळ मुख्याधिकाऱ्यांकडेच राहणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

विभागप्रमुखांकडून संबंधित बिल तयार केल्यानंतर आवश्यक लेखापरीक्षणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मुख्याधिकारी बिलावर अंतिम स्वाक्षरी करून आर्थिक व्यवहाराची प्रक्रिया पूर्ण करतील. या प्रक्रियेत नगराध्यक्षांची स्वाक्षरी घेणे आता बंधनकारक राहणार नाही.

शासनाच्या या स्पष्टीकरणामुळे प्रशासकीय पातळीवरील संभ्रम दूर झाला असला, तरी लोकनियुक्त नगराध्यक्षांच्या अधिकारांबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. वित्तीय व्यवहारांवरील नियंत्रणाचे अधिकार कमी झाल्याने नगराध्यक्षांची भूमिका आणखी मर्यादित होत असल्याची नाराजी काही लोकप्रतिनिधींमधून व्यक्त होत आहे. त्यामुळे शासनाच्या या निर्णयाचे प्रशासकीय आणि राजकीय पातळीवर काय पडसाद उमटतात, याकडे आता लक्ष लागले आहे.

# संगमनेरमध्ये १७०० किलो गोमांस जप्त

## चौघे ताब्यात,एलसीबीची धडक कारवाई



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरात गोवंशाची कत्तल करून मांसाची विक्री करण्याच्या संशयावरून स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मोठी कारवाई केली. सुकेवाडी-समनापूर रस्त्यावर सापळा रचून पोलिसांनी १७०० किलो गोमांस आणि महिंद्रा पिकअप वाहन असा एकूण ११ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत चौघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलिसांना जमजम कॉलनी परिसरात गोवंशाची कत्तल करून मांस पिकअप वाहनातून विक्रीसाठी नेले जात असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे एलसीबीच्या पथकाने सुकेवाडी-समनापूर रस्त्यावर सापळा रचला. संशयित पिकअप वाहन आढळताच पोलिसांनी ते अडवून तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात मांस आढळून आले. या कारवाईत अब्दुलहमीद कुरेशी, कलामुद्दीन खान, अरबाज खान आणि कैश इनामदार यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. जप्त केलेल्या गोमांसाची अंदाजे किंमत ५ लाख १० हजार रुपये, तर महिंद्रा पिकअप वाहनाची किंमत ६ लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

याप्रकरणी संगमनेर शहर पोलिस ठाण्यात संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे. या कारवाईमुळे शहरातील अवैध कत्तल व मांसविक्रीच्या प्रकारांवर पुन्हा एकदा पोलिसांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
We treat He cure's
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# संगमनेरात बालकला महोत्सवाचे उत्साहात उद्घाटन



युवावार्ता (प्रतिनिधी):

संगमनेर - विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, सुप्त कलागुण आणि विविध कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी जय हिंद लोकचळवळ या संस्थेच्या वतीने डॉ. देवेंद्र ओहरा यांच्या ३३ व्या जयंतीनिमित्त आयोजित बाल कला महोत्सवाचे उद्घाटन संगमनेर येथे झाले. संग्राम संस्थेचे विश्वस्त स्व. डॉ. देवेंद्र ओहरा यांचे ३३ वर्षांपूर्वी अपघाती निधन झाले. त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची स्मृती कायम तेवत राहावी, या उदात्त हेतूने आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी डॉ. देवेंद्र ओहरा यांच्या जयंतीनिमित्त बालकला महोत्सवा' चे आयोजन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. हा उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे यशस्वीरीत्या राबवला जात आहे, असे प्रतिपादन जयहिंद लोकचळवळ या संस्थेचे सेक्रेटरी डॉ. नामदेवराव गुंजाळ यांनी प्रास्ताविक करताना केले.

ते पुढे म्हणाले की, या महोत्सवाच्या माध्यमातून तालुक्यातील हजारो विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांना वाव देण्याचे उत्तम व्यासपीठ मिळाले असून, ते याचा प्रत्यक्ष लाभ घेत आहेत, याचा मनस्वी आनंद वाटतो. या उपक्रमात हिरिरीने सहभागी होणाऱ्या सर्व शाळा, त्यांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि बालकलाकारांचे मी या निमित्ताने मन:पूर्वक आभार मानतो. डॉ. सुधीरजी तांबे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या महोत्सवाच्या माध्यमातून बालगोपाळांना त्यांच्या कलात्मकतेला मुक्त वाव देण्यासाठी एक सशक्त व्यासपीठ यानिमित्ताने उपलब्ध झाले आहे.

स्व. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुलात आयोजित या महोत्सवचे उद्घाटन नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा व जय हिंद महिला मंच अध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे यांच्या शुभहस्ते झाले. जय हिंद लोकचळवळीचे सेक्रेटरी डॉ. नामदेवराव गुंजाळ हे अध्यक्ष स्थानी होते व ॲड. सुहास आहेर, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात साखर कारखान्याचे संचालक अंकुश ताजणे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. उद्घाटन प्रसंगी दुर्गाताई म्हणाल्या की डॉ. सुधीर तांबे आणि डॉ. देवेंद्र ओहरा यांच्यातील ऋणानुबंध हे केवळ मैत्रीपुरते मर्यादित नव्हते तर ते दोघे अगदी सख्या भावांप्रमाणे एकमेकांवर प्रेम करायचे. त्यांचे नाते अत्यंत निस्वार्थी आणि निर्मळ होते. काळाच्या ओघातही ही आपुलकी आणि आस्था तशीच कायम आहे. आजही आमचे कुटुंब ओहरा परिवाराच्या प्रत्येक सुख-दु:खात तितक्याच तत्परतेने आणि आपुलकीने खंबीरपणे पाठीशी उभे राहते.

याप्रसंगी रू. दा. मालपाणी विद्यालयाचे मुख्याध्यापक एरंडे सर, सिद्धार्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक रघुनाथ जगताप, निसर्गचित्र कलाकार प्रा. राहुल पगारे, लॅण्ड अँड हॅण्डचे नवले सर आणि कागदी फुल कलाकार सरोदे यांच्यासह शिक्षण व कला क्षेत्रातील विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महोत्सवाचे नियोजन प्रकल्प प्रमुख प्रकाश पारखे सर यांच्या नेतृत्वाखाली पार पडत असून, याकामी कलाध्यापक संघाचे अध्यक्ष संतोष गोरे आणि सचिव रावताळे सर यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

या बाल कला महोत्सवात विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, निसर्गचित्र, मातीकाम, पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती, कागदी फुले तयार करणे, लॅण्ड अँड हॅण्ड, डूडल आर्ट, ३ऊ प्रिंटिंग, ड्रोन ऑपरेटर प्रशिक्षण, संगीत, कॅलिग्राफी, वॉटर कलर आर्ट, बाहुली काम आणि झुंबा डान्स यांसारख्या विविध कलात्मक व तंत्रज्ञानाधारित उपक्रमांची मोठी रेलचेल आहे.

# जवाहरलाल नेहरू उर्दू सेंटरचे कार्य स्तुत्य : प्रा. बाबा खरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - वर्षभर विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्याची परंपरा जवाहरलाल नेहरू उर्दू सेंटरने कायम ठेवली आहे. शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा विविध पुरस्कारांनी सन्मान करण्याचा उपक्रम स्तुत्य असल्याचे गौरवोद्गार सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक संस्थेचे सचिव तथा आदिवासी सेवक प्रा. बाबा खरात यांनी काढले.

समनापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळेत सेंटरच्या वतीने आयोजित 'शिक्षक सन्मान' कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाच्या शाळांची संख्या वाढत असली, तरी उर्दू माध्यमाच्या शाळांमध्येही विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी मेहनत घेणाऱ्या शिक्षकांचा सन्मान होणे कौतुकास्पद असल्याचे प्रा. खरात यांनी सांगितले.

कार्यक्रमात संगमनेर, अकोले व कोपरगाव उर्दू विभागाचे केंद्रप्रमुख शाह जुनेद इब्राहिम तसेच जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा, समनापूर यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कोल्हार येथील सौ. समिना राज मोहम्मद शेख यांचा गणित शिष्यवृत्ती परीक्षेसाठी पुस्तक लेखन केल्याबद्दल सन्मान करण्यात आला. पिरजादे नाझेमा फकीर मोहम्मद व काझी मेहरजबीन एजाज यांना 'फारुक सय्यद आयडियल टीचर' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रमुख पाहुणे डॉ. जी. पी. शेख व अब्दुल्ला चौधरी यांनी शेरो-शायरीच्या माध्यमातून शिक्षकांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. शेख राजमोहम्मद यांनी शैक्षणिक उपक्रमांबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष शेख ईदरीस यांनी केले. उपाध्यक्ष सय्यद आसिफ अली यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. सूत्रसंचालन शेख ईदरीस व सौ. तरन्नूम शेख यांनी केले, तर मुख्याध्यापक मो. सईद यांनी आभार मानले. यावेळी शिक्षक, विद्यार्थी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कै. निवृत्ती गवळी यांना मरणोत्तर 'राष्ट्रगौरव पुरस्कार



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- भारतीय सेनेत सेवा बजावताना देशासाठी योगदान देणारे संगमनेर येथील कै. निवृत्ती गणपत गवळी यांना १९७१ च्या भारत-पाक युद्धातील अतुलनीय सेवेसाठी मरणोत्तर 'राष्ट्रगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या देशसेवेची दखल घेत मिळालेला हा सन्मान संगमनेर तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

अखिल भारतीय प्रतिभा महासंमेलन, शिर्डी यांच्या वतीने हॉटेल साई पासो येथे रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रमी सरदार नरवीर तानाजी मालुसरे यांचे वंशज कुणाल मालुसरे यांच्या हस्ते कै. गवळी यांना मरणोत्तर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कै. निवृत्ती गवळी यांच्या वतीने त्यांच्या पत्नी श्रीमती राधाबाई निवृत्ती गवळी यांनी पुरस्कार व सन्मानचिन्ह स्वीकारले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी कै. गवळी यांच्या देशसेवेच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या त्यागाला अभिवादन केले. रेडियंट टॅलेंट बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड आणि ज्ञान उदय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात देशभरातील विविध क्षेत्रांतील प्रतिभावंत आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला.

१९७१ च्या भारत-पाक युद्धाच्या काळात कै. निवृत्ती गवळी यांनी भारतीय सेनेत बजावलेल्या कर्तव्याची आणि देशसेवेतील त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना हा मरणोत्तर सन्मान देण्यात आला. त्यांच्या शौर्य, त्याग आणि देशनिष्ठेचा गौरव करणारा हा पुरस्कार त्यांच्या कुटुंबीयांसह संगमनेर तालुक्यासाठीही अभिमानाचा क्षण ठरला आहे.

# सुकेवाडी-खांजापूरचा अखंड हरिनाम सप्ताह ठरतोय लक्षवेधी

## आठ दिवस गावात चूल न पेटवता सामूहिक अन्नदान

युवावार्ता (प्रतिनिधी)

सुकेवाडी - संगमनेर तालुक्यातील सुकेवाडी-खांजापूर गावचा अखंड हरिनाम सप्ताह यंदा भक्ती, एकोपा आणि सामाजिक बांधिलकीचे अनोखे दर्शन घडवत असून, या सप्ताहाने तालुक्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे. आठ दिवस चालणाऱ्या या धार्मिक उत्सवाला भाविकांची मोठी गर्दी होत असून, संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले आहे.

या सप्ताहाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आठही दिवस गावातील कोणत्याही घरात चूल पेटली नाही. गावातील अन्नदान करणाऱ्या दात्यांनी दररोज भाविकांसाठी पंगतीचे आयोजन करून सामूहिक भोजनाची व्यवस्था केली. त्यामुळे ग्रामस्थांसह बाहेरून येणाऱ्या भाविकांनाही प्रसादाचा लाभ मिळत असून, अन्नदानाच्या या परंपरेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सप्ताहातील कीर्तन, प्रवचन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांना महिला भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभत आहे. गावातील माय-माऊलींचा उत्स्फूर्त सहभाग हा सप्ताहाचा विशेष आकर्षण ठरत आहे. दररोज होणाऱ्या कीर्तनाला महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तिरसाचा आनंद घेत आहेत.

विशेष म्हणजे, या सप्ताहात गावातील तरुणांचा सहभागही लक्षणीय आहे. तरुणांनी सप्ताहाच्या नियोजनापासून ते विविध व्यवस्थांपर्यंत जबाबदारी स्वीकारत, उत्सव शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी विशेष सहकार्य केले. त्यामुळे आठ दिवसांचा हा धार्मिक सोहळा कोणताही गालबोट न लागता आनंद आणि उत्साहाच्या वातावरणात सुरू आहे.

गावच्या कीर्तनसेवेचे दान असल्याने महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांनीही सुकेवाडी-खांजापूर येथे उपस्थित राहून आपली सेवा अर्पण केली. त्यांच्या कीर्तनातून ग्रामस्थांना आध्यात्मिक आणि सामाजिक संदेश मिळत असून, संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले आहे.

धर्मकार्याच्या निमित्ताने संपूर्ण गाव एकत्र येऊन एकोपा जपण्याची परंपरा सुकेवाडी-खांजापूर ग्रामस्थांनी यंदाही कायम ठेवली आहे. महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक आणि युवक अशा सर्वच घटकांचा उत्स्फूर्त सहभाग असल्याने हा सप्ताह केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता गावच्या सामाजिक एकतेचे प्रतीक ठरत आहे.

आठ दिवसांचा हा भक्तिमय उत्सव आता सांगता समारंभाकडे वाटचाल करत असून, सुकेवाडी-खांजापूर गावच्या या आगळ्यावेगळ्या सप्ताहाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे. गावातील सर्वजण एकत्र आले, तर धार्मिक कार्यासोबतच सामाजिक एकोपा आणि सामूहिक शक्तीचे दर्शन कसे घडू शकते, याचे आदर्श उदाहरण सुकेवाडी-खांजापूरच्या सप्ताहातून पाहायला मिळत आहे.

# शिवतत्त्व जागृत करणारा श्रावणी सोमवार

आज पवित्र श्रावण महिन्यातील शेवटचा, चौथा श्रावणी सोमवार. भगवान शिवाच्या उपासनेसाठी अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या या दिवसानिमित्त आज सर्व शिवमंदिरांमध्ये भक्तांची मोठी गर्दी, अभिषेक, पूजा-अर्चा आणि हर हर महादेवच्या जयघोषाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

आद्य शंकराचार्यांनी आपल्या वेदसारशिवस्तव या स्तोत्रातून भगवान शंकराच्या स्वरूपाचे अत्यंत सुंदर वर्णन केले आहे. सर्व पापांचा नाश करणारे, ज्यांच्या जटासमूहात गंगेचा प्रवाह शोभून दिसतो, मदनाला भस्म करणारे भगवान शंकर यांचे मी स्मरण करतो. पृथ्वी, जल, तेज, वायू आणि आकाश यांसारख्या पंचमहाभूतांपलीकडे असणारे, तंद्रा, निद्रा, ग्रीष्म, वर्षा अथवा शीत यांचा ज्यांच्याशी संबंध नाही, ज्यांना देश नाही, वेश नाही; परंतु विश्वकल्याणासाठी ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तीन रूपांत प्रकट होणाऱ्या त्या भगवान शंकराची आपण स्तुती करतो.

जो जन्मरहित आहे, अविनाशी आहे, जो कारणाचेही कारण आहे, कल्याणस्वरूप आहे, अद्वितीय आहे, प्रकाशांचाही प्रकाश आहे; जो स्थूल, सूक्ष्म आणि कारण या अवस्थांच्या तसेच जागृती, स्वप्न आणि सुषुप्ती या तीनही अवस्थांच्या पलीकडे आहे, अज्ञानरूपी अंधकाराच्या पलीकडील ज्योतीस्वरूप आहे, अशा द्वैतविरहित, परमपावन, अनादी-अनंत भगवान शंकराला आपण आनंदभावाने शरण जाऊया.



आद्य शंकराचार्य पुढे म्हणतात-हे प्रभो, विश्वव्यापक विश्वनाथा, महादेवा, शंभो, महेशा, मदनाचा संहार करणाऱ्या, त्रिपुराचा नाश करणाऱ्या, पार्वतीवल्लभा! या जगात तुझ्याशिवाय श्रेष्ठ, माननीय आणि जुमानण्याजोगे दुसरे कोणीही नाही.

मंगलस्वरूप असलेले, जीवांना भवसागरातील रोगातून मुक्त करणारे औषधस्वरूप असलेले आणि ' नमः शिवाय' या पंचाक्षरी मंत्ररूपी पंजराने भक्तांना रमवून सुखी करणारे भगवान शंकर हे संपूर्ण विश्वाच्या उत्पत्ती, स्थिती आणि लयाचे कारण आहेत. अशा भगवान शिव-पार्वतीला आपण मनोभावे नमस्कार करूया. नंदीला वाहन मानणारे आणि ब्रह्मदेव, विष्णू तसेच इंद्र यांसारख्या देवतांनी ज्यांची मनोभावे पूजा केली आहे, सर्वांगाला भस्म धारण करणारे भगवान शंकर आणि सर्वांगाला चंदनाची उटी लावणारी देवी पार्वती-या शिव-पार्वती दांपत्याला वारंवार नमस्कार.

भगवान शिवाला प्रसन्न करण्यासाठी मोठमोठ्या पूजा-अर्चांची आवश्यकता नाही. श्रद्धेने अर्पण केलेले एक बिल्वपत्रही शिवाला प्रिय आहे. मात्र या बाह्य पूजेबरोबरच आपल्या अंतर्मनातील शिवतत्त्व जागृत करणे अधिक महत्त्वाचे आहे.

हे शिवतत्त्व आपल्यामध्येच आहे. आपल्या अस्तित्वावर या शिवतत्त्वाचा सतत अभिषेक होत असतो आणि म्हणूनच आपण चैतन्यस्वरूप आहोत. ' नमः शिवाय' हा मंत्र केवळ उच्चारण्याचा मंत्र नसून तो आपल्या अंतर्मनातील शिवतत्त्व जागृत करणारा महामंत्र आहे. आपल्या आतील शिवतत्त्व जागृत झाले की आपल्या जगण्याचे महत्त्व, जीवनाचा उद्देश आणि माणुसकीचे खरे स्वरूप आपल्याला उमगू लागते.

श्रावण महिना कधी संपूच नये, असे प्रत्येक शिवभक्ताला वाटते. मात्र आता श्रावण संपून भाद्रपदाचे आगमन होणार आहे आणि लवकरच आपल्या लाडक्या श्री गणरायाचे आगमन होईल. हिंदू धर्मातील प्रत्येक सण आणि उत्सव हा केवळ धार्मिक विधी नसून आपल्या जीवनात आनंद, उत्साह, ऊर्जा, पवित्रता, चैतन्य आणि अध्यात्मिकता निर्माण करणारा संस्कार आहे.

म्हणूनच सण-उत्सव साजरे करताना कोणत्याही वादात न पडता, आपली परंपरा आणि संस्कृती जपत, स्वत:ला आनंद मिळेल आणि दुसऱ्याला त्रास होणार नाही, अशा पद्धतीने आपण हे उत्सव साजरे करूया.

आपले सण आणि उत्सव म्हणजे आनंद, उत्साह, पवित्रता, चैतन्य आणि अध्यात्मिकतेचा सुंदर संगम आहे. या परंपरेतील शिवतत्त्व आपल्या अंत:करणात जागृत होवो आणि सर्वांच्या जीवनात सुख, शांती व समाधान नांदो, हीच भगवान शिवचरणी प्रार्थना!

**प्रा. शशांक गंधे**
**संगमनेर, जि. अहिल्यानगर**
**मोबा.९८९०१६३६४२**

# श्री नरसिंह मंदिरात लघुरुद्र महाभिषेक भक्तिमय वातावरणात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्री नरसिंह मंदिरात वैदिक ब्राह्मण पुरोहित प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेला लघुरुद्र महाभिषेकाचा धार्मिक सोहळा अत्यंत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या श्रद्धेने संपन्न झाला. अभिषेक, वैदिक मंत्रोच्चार आणि आरतीच्या मंगलमय वातावरणाने मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

यावेळी वैदिक ब्राह्मण पुरोहितांच्या मंत्रघोषात विधिवत लघुरुद्र महाभिषेक करण्यात आला. या धार्मिक सोहळ्यात यजमान, मंदिर व्यवस्थापनाचे पदाधिकारी व सदस्य, वैदिक ब्राह्मण पुरोहित प्रतिष्ठानचे सदस्य तसेच मोठ्या संख्येने भक्तगण व हितचिंतक सहभागी झाले होते.

अभिषेक व आरतीच्या संपूर्ण कार्यक्रमात उपस्थितांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सर्वांच्या सहकार्यामुळे हा धार्मिक सोहळा सुरळीत आणि यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मेहनत घेणारे यजमान, मंदिर व्यवस्थापन, प्रतिष्ठानचे सदस्य आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे यावेळी मन:पूर्वक आभार मानण्यात आले. वैदिक ब्राह्मण पुरोहित प्रतिष्ठानच्या वतीने भविष्यातही विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, त्यासाठी नागरिकांचे प्रेम, सहकार्य आणि आशीर्वाद असेच कायम राहावेत, अशी अपेक्षा प्रतिष्ठानच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

सर्वांच्या सहकार्यामुळेच हा भक्तिमय सोहळा यशस्वी झाला. यापुढेही प्रतिष्ठानच्या उपक्रमांना समाजबांधवांचे असेच सहकार्य लाभावे, ही श्री नरसिंह चरणी प्रार्थना, अशी भावना प्रतिष्ठानच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

# संपादकीय...

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस निमित्ताने

## साक्षरतेतून ज्ञानसमृद्ध समाजाकडे वाटचाल

दरवर्षी ८ सप्टेंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस' म्हणून जगभरात साजरा केला जातो. शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणे, निरक्षरतेविरुद्ध जनजागृती करणे आणि प्रत्येक व्यक्तीला वाचन-लेखनाचे मूलभूत ज्ञान मिळावे यासाठी समाजाला प्रेरित करणे, हा या दिवसामागील प्रमुख उद्देश आहे. मात्र साक्षरता म्हणजे केवळ अक्षर ओळखणे किंवा आपले नाव लिहिता येणे एवढ्यापुरती मर्यादित संकल्पना राहिलेली नाही. आजच्या डिजिटल युगात माहिती समजून घेणे, योग्य-अयोग्य माहितीची चिकित्सा करणे, तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करणे आणि आत्मविश्वासाने निर्णय घेणे यांचाही साक्षरतेत समावेश होतो. साक्षरता ही व्यक्तीच्या विकासाची पहिली पायरी आहे. एखाद्या व्यक्तीला वाचता-लिहिता येऊ लागले की त्याच्यासमोर ज्ञानाचे असंख्य दरवाजे खुले होतात. शिक्षणामुळे माणूस आपल्या हक्कांविषयी जागरूक होतो. सरकारी योजना, बँकिंग व्यवस्था, आरोग्यविषयक सूचना, शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, रोजगाराच्या संधी आणि कायदेशीर बाबी समजून घेणे त्याला शक्य होते. त्यामुळे साक्षरता ही केवळ वैयक्तिक प्रगतीची बाब नसून सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. भारतासारख्या विशाल आणि विविधतेने नटलेल्या देशासाठी साक्षरतेचे महत्त्व अधिक आहे. देशाने शिक्षणाच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली असली तरी गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा समान लाभ प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे हे अजूनही मोठे आव्हान आहे. ग्रामीण भागातील काही कुटुंबे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, स्थलांतरित कामगार, वंचित समाजघटक आणि शिक्षणापासून दूर राहिलेल्या प्रौढ व्यक्तींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे. विशेषतः महिला साक्षरता ही समाजाच्या प्रगतीची महत्त्वाची गुरुकिल्ली आहे. एक महिला शिक्षित झाली की तिचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो. शिक्षित आई मुलांच्या शिक्षणाकडे अधिक गांभीर्याने पाहते, आरोग्य आणि पोषणाबाबत योग्य निर्णय घेते आणि कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीत सक्रिय भूमिका बजावते. त्यामुळे मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे म्हणजे भविष्यातील पिढीला सक्षम करण्याची गुंतवणूक होय. आज साक्षरतेसमोर एक नवे आव्हान उभे राहिले आहे-डिजिटल निरक्षरता. मोबाईल आणि इंटरनेटचा वापर वाढला असला तरी डिजिटल माध्यमातून मिळणारी माहिती खरी की खोटी, याचा विचार करण्याची क्षमता प्रत्येकाकडे असेलच असे नाही. सोशल मीडियावरील अफवा, चुकीची माहिती, बनावट बातम्या आणि ऑनलाइन फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी डिजिटल साक्षरता अत्यावश्यक झाली आहे. त्यामुळे आजच्या काळात 'वाचता येणे' एवढेच पुरेसे नाही; वाचलेले समजणे आणि समजलेले विवेकाने तपासणे तितकेच महत्त्वाचे आहे. साक्षर समाज हा अधिक जागरूक समाज असतो. मतदान करताना उमेदवार आणि धोरणांचा विचार करणे, सार्वजनिक प्रश्नांवर भूमिका घेणे, पर्यावरणाचे रक्षण करणे, आरोग्याची काळजी घेणे आणि कायद्याचे पालन करणे यामध्ये शिक्षणाची मोठी भूमिका असते. म्हणूनच साक्षरता ही लोकशाही मजबूत करणारी शक्ती आहे. जागरूक नागरिक प्रश्न विचारतो, आपल्या अधिकारांची जाणीव ठेवतो आणि कर्तव्यांचीही जपणूक करतो. साक्षरतेचा संबंध रोजगाराशीही थेट जोडलेला आहे. आधुनिक अर्थव्यवस्थेत कौशल्याधारित रोजगाराच्या संधी वाढत आहेत. त्यासाठी मूलभूत शिक्षणाबरोबरच संगणक, डिजिटल व्यवहार, आर्थिक नियोजन, संवादकौशल्य आणि तांत्रिक कौशल्यांची गरज आहे. साक्षरतेपासून कौशल्याकडे आणि कौशल्यापासून स्वावलंबनाकडे जाणारा प्रवास देशाच्या आर्थिक विकासाला गती देऊ शकतो. मात्र केवळ सरकारच्या प्रयत्नांनी शंभर टक्के साक्षर समाज निर्माण होणार नाही. यासाठी शाळा, शिक्षक, पालक, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संघटना आणि सुशिक्षित नागरिक यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.


### जाहीर लिलाव

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घिगेवाडी**

**ता. अकोले, जि.अहिल्यानगर**

जि.प.प्रा.शाळा घिगेवाडी (UDISE 27260116002), ता. अकोले येथील जुनी इमारत क्र. १ चे साहित्य (पत्रे, लाकूड, लोखंड, दगड) चा जाहीर लिलाव मंगळवार, दि. १५/०९/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. शाळेत होईल.

मुख्याध्यापक

जि. प. प्राथ. शाळा, घिगेवाडी, ता. अकोले


# मातोश्री ललितादेवी मालपाणी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -शिक्षण प्रसारक संस्थेचे मातोश्री ललिता देवी मालपाणी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेर येथे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे आयोजन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. माजी राष्ट्रपती, महान तत्त्वज्ञ व शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमातून शिक्षकांविषयीचा आदर, कृतज्ञता आणि शिक्षकाच्या जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. भालचंद्र भावे व सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थिनी शर्मिन खान व अपर्णा कुलकर्णी यांनी शिक्षकांप्रती आपल्या भावना व्यक्त केल्या. विद्यार्थी अनुजा सराफ यांनी आपल्या कवितेतून तर सर्वज्ञ संत हिने सादर केलेल्या सुंदर गायनातून शिक्षकांविषयीचा आदर व कृतज्ञता व्यक्त केली. प्राध्यापक मनोगतामध्ये डॉ. राजू शेख यांनी आजच्या बदलत्या विद्यार्थी जीवनात शिक्षकाची भूमिका किती महत्त्वपूर्ण आहे यावर भाष्य करतांना शिक्षकांनी आपली भूमिका जबाबदारीने व संवेदनशीलतेने पार पाडावी असे नमूद केले कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर भालचंद्र भावे यांनी अध्यक्षीय मनोगतातून शिक्षकाची समाज घडविण्यात भूमिका स्पष्ट केली. 'आदर्श शिक्षक कसा असावा?' हे काव्याच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडत त्यांनी शिक्षकाच्या व्यक्तिमत्वातील संवेदनशीलता, ज्ञान, संस्कार आणि मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी प्रा. मंगल आरोटे प्रा. नयना पंजे प्रा. कविता काटे प्रा. विद्या भवर, प्रा. डॉ. ज्योती मेस्त्री प्रा. संजय खेमनर, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बी.एड. प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची पाबळ तर रुही गाडेकर यांनी प्रास्तिवक केले तर अपर्णा कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# जिजामाता स्कूलमध्ये जन्माष्टमी उत्साहात

युवावार्ता (प्रतिनिधी)

जिजामाता स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या उत्साहात, आनंदात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेत विविध सांस्कृतिक उपक्रमांसह इंटर हाऊस दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत संपूर्ण परिसरात कृष्णमय वातावरण निर्माण केले.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या प्राचार्या व उपप्राचार्या यांच्या हस्ते भगवान श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी राधा-कृष्ण वेशभूषा, भक्तिगीते, नृत्य तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. राधा-कृष्णाच्या वेशभूषेत सजलेले बाळगोपाळ सर्वांचे विशेष आकर्षण ठरले. 'गोविंद बोलो हरी गोपाल बोलो' या जयघोषाने संपूर्ण शाळेचे वातावरण भक्तिमय व आनंदमय झाले. शिक्षकांनी श्रीकृष्ण जन्मोत्सवावर आधारित नाटिका सादर करून विद्यार्थ्यांना श्रीकृष्ण जन्माष्टमीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व समजावून सांगितले. सण-उत्सव साजरे करताना एकता, सहकार्य, आनंद वाटून घेणे तसेच आपल्या भारतीय संस्कृती व परंपरांचा आदर करणे, या मूल्यांची जाणीवही विद्यार्थ्यांना करून देण्यात आली.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी भगवान श्रीकृष्णासाठी आकर्षक व पौष्टिक ५६ भोगांचा नैवेद्य साकारला. विविध पारंपरिक व पौष्टिक खाद्यपदार्थांनी सजविलेली ही आरास उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरली. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या सहभागातून साकारलेल्या या उपक्रमातून भारतीय संस्कृती आणि परंपरेचे सुंदर दर्शन घडविले. शाळेच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना एकता, सहकार्य आणि सदैव चांगल्या कर्माचा मार्ग स्वीकारण्याचा मोलाचा संदेश दिला. स्पर्धेत विंध्य व सह्याद्री हाऊसने प्रथम क्रमांक पटकावत श्रीकृष्णाच्या जयघोषात दहीहंडी फोडून उत्सवाची सांगता केली. विद्यार्थ्यांच्या उत्साहामुळे दहीहंडी सोहळ्याला विशेष रंगत आली.



# पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'द ट्रेंड फेस्ट' उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेर येथे 'द ट्रेंड फेस्ट - **Turning Waste into Wow!**' या विशेष उपक्रमाचे आयोजन ३ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आले. शाळेच्या "The Conscious Closet - Choices That Shape Our Planet' या Integrated Learning Programme च्या समारोपाचा हा विशेष उपक्रम होता.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना फॅशनच्या पलीकडे जाऊन कपड्यांचा पर्यावरणावर तसेच समाजावर होणारा परिणाम समजून घेण्याची संधी मिळाली. कपड्यांची निर्मिती, वापर, पुनर्वापर, पुनर्रचना आणि विल्हेवाट याबाबत विद्यार्थ्यांनी विविध कृती व सादरीकरणांच्या माध्यमातून जनजागृती केली.

कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाची ओळख, अतिथींचे स्वागत व सत्कार आणि उद्घाटनाने झाली. त्यानंतर शाळेच्या प्राचार्या मीनाक्षी मिश्रा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरलेला Primary Eco-Fashion Show विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने रंगला. विद्यार्थ्यांनी जुन्या, वापरलेल्या, दुरुस्त केलेल्या व पुनर्वापरित कपड्यांपासून तयार केलेले आकर्षक पोशाख सादर करत "Reuse, Repair and Repurpose'चा संदेश दिला.

यासोबतच Thrift Store, Game Stall आणि Food Stall उभारण्यात आले. "The Upcycling Challenge' या खेळातून विद्यार्थ्यांनी जुन्या कपड्यांना नव्या रूपात आणण्याचे कौशल्य दाखवले, तर "Sustainable or Not?' या Sorting Game द्वारे शाश्वत आणि अशाश्वत फॅशनविषयीची समज दृढ केली.

कार्यक्रमातील "30 Wears' Graffiti Wall, Expression Wall, Clothing Donation Corner आणि "Patch Together for the Planet' यांसारख्या उपक्रमांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी जुन्या कपड्यांचे दान, पुनर्वापर आणि कपड्यांचा जास्तीत जास्त काळ वापर करण्याबाबत संदेश दिले.

"Landfill Installation' आणि "Fashion Waste Monster' या जागरूकता उपक्रमांद्वारे वाढत्या वस्त्रोद्योग कचऱ्याचे गांभीर्य प्रभावीपणे मांडण्यात आले. तसेच "The True Cost' या माहितीपटाच्या माध्यमातून फास्ट फॅशनचे मानवी व पर्यावरणीय परिणाम समजावून सांगण्यात आले.

या संपूर्ण उपक्रमामागील उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैली, जबाबदार खरेदी, पुनर्वापर आणि शाश्वत फॅशन यांविषयी जागरूकता निर्माण करणे हा होता. विद्यार्थ्यांनी सर्जनशीलता, संघभावना आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडवून आणत 'कचऱ्यापासून कलात्मकतेकडे आणि फॅशनपासून शाश्वततेकडे' असा प्रभावी संदेश दिला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या प्राचार्या मीनाक्षी मिश्रा, उपप्राचार्य योगेश आवारी तसेच पंकज कुंटे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी शाळेचे समन्वयक संकर्शन मुसमाडे, मुक्ता घुंडीयाल, जयश्री देशमुख यांचे विशेष सहकार्य लाभले. अँडमिन ऑफिसर सागर निरपगार यांचेही विशेष सहकार्याला लाभले.


### विश्वकर्मा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर

मुरली शकुंतल कॉम्प्लेक्स, संगमनेर, जि. अ. नगर

मो. नं. 9623224509

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

(फक्त सभासदांसाठी)

विश्वकर्मा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर या संस्थेची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १३/०९/२०२६ रोजी दुपारी १.०० वा. विश्वकर्मा समाज महादेव मंदिर सभागृह, सुतार गल्ली, संगमनेर येथे संस्थेचे विद्यमान चेअरमन श्री. संपत दत्तात्रय सुर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सदर सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार

**श्री. अरुण सोमनाथ उदमले**

मॅनेजर, विश्वकर्मा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., संगमनेर

### पाहिजेत

ऑफिस बॉय (प्युन)

शिक्षणास प्राधान्य कॉम्प्युटर ज्ञान, स्वतःचे वाहन आवश्यक

- संपर्क -

8378956909

8459199913

बायोडाटा पाठवा

### पाहिजेत

कॉम्प्युटर ऑपरेटर - ४

अकाऊंटंट - २

सेल्समन - ५

(इन्सेंटीव्ह दिला जाईल)

आकर्षक पगार दिले जाईल

9822097904

9404971697

भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

### FinanCity

STOP THINKING START INVESTING

**उत्कृष्ट करिअर संधी तुमच्यासाठी !**

उत्तम संधी, उत्तम करिअर आणि उज्वल भविष्य तुमच्या प्रतीक्षेत आहे

१२ सप्टेंबरपर्यंत मुलाखत सुरू आहे

**बँक ऑफिस - २५ जागा (महिला)**

डेटा एन्ट्री व डॉक्युमेंटेशन रिपोर्ट तयार करणे, ऑफिस सपोर्टची कामे

पात्रता - कोणत्याही शाखेतील पदवीधर

**ॲडमिन / एचआर - २ जागा (महिला)**

प्रशासकीय कामे, कर्मचारी समन्वय, एचआर संबंधित कागदपत्रे

पात्रता- कोणत्याही शाखेतील पदवीधर

**फिल्ड वर्क सेल्स मॅनेजर- ५ जागा (पुरुष)**

फिल्ड भेटी व ग्राहक संपर्क, नवीन ग्राहक जोडणे, सेल्स टार्गेट पूर्ण करणे

पात्रता- कोणत्याही शाखेतील पदवीधर

**FINANCITY सोबत करिअर का घडवावे?**

आकर्षक पगार व कमिशन,करिअर मध्ये वाढीच्या संधी, मैत्रीपूर्ण कामाचे वातावरण, स्थैर्य आणि सुरक्षित भविष्य, परफॉर्मन्सवर आधारित प्रोत्साहन

अधिक माहितीसाठी संपर्क करा

7208095977 / 9623532907

फायनान्स सिटी, नेअर ग्रेव्ही यार्ड हॉटेल, अकोले बायपास रोड, संगमनेर

### पाहिजेत

मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे

प्रभात मेडिकल

नवीन नगर रोड, ताजने मळी, संगमनेर

- संपर्क -

9921245753

### जागा विकणे आहे

अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.

एजंट स्वागत

- संपर्क -

9890468212

### पाहिजेत

सेल्समन

(महिला/ युवती प्राधान्य)

लिरा द कॉस्मेटिक्स झोन

वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर

मो. 7499630747

### भाड्याने देणे आहे

सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे

सुकेवाडी रोड, संगमनेर

8282825818



SR THORAT

JOB

GAGANGIRI PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar

Mobile Number – 9860100936/937

Sent the CV Following E-Mail Id:

admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com






### पाहिजेत

सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे

कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक

(२ जागा त्वरीत भरणे आहे)

कामाची वेळ दु. १२ ते ८

संपर्क– जाधव सोनोग्राफी सेंटर मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर

9307188862

### पाहिजेत

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस

सिक्युरिटी गार्ड - ५

सफाई कर्मचारी - ५

हेल्पर - ५

पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड

संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर

7709828846

### नोकरीची सुवर्णसंधी

श्री गणेश टायर्स

अकाऊंटंट - १

टॅली, जीएसटी ज्ञानास प्राधान्य

सेल्स एक्झीक्युटिव्ह - १

बॅटरी व इंजिन ऑईलच्या विक्री क्षेत्रातील अनुभव

अनुभावानुसार आकर्षक पगार

पत्ता - तीन बत्ती चौक, संगमनेर

८९९९८६२७५९

### पाहिजेत

जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी

सेल्स एक्झीक्युटिव्ह -४

मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४

हेल्पर - २

मेन रोड, संगमनेर

7588249849

# निझर्णेश्वर परिसरात दुचाकी चोरीचे सत्र

## भाविकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर, मंदिराबाहेर काही दिवसांत तीन दुचाकी लंपास



युवावार्ता (प्रतिनिधी)

कोकणगाव -श्रावण मासानिमित्त भाविकांची मोठी गर्दी होत असलेल्या श्री क्षेत्र निझर्णेश्वर महादेव मंदिर परिसरात दुचाकी चोरीच्या घटनांनी डोके वर काढले आहे. मागील काही दिवसांत मंदिर परिसरातून तब्बल तीन दुचाकी चोरीला गेल्याची माहिती समोर आल्याने भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

श्रावण महिन्यात पंचक्रोशीसह जिल्ह्याच्या विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने निझर्णेश्वर महादेवाच्या दर्शनासाठी येतात. त्यातच श्रावणी सोमवारी मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी असते. या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरटे पार्किंगमध्ये उभ्या केलेल्या दुचाकींवर डल्ला मारत असल्याचे समोर आले आहे. चोरीस गेलेल्या वाहनांमध्ये शिवापूर, कोकणगाव तसेच मनोली परिसरातील भाविकांच्या दुचाकींचा समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे.

श्रावणी सोमवारी वन विभागाच्या वतीने पार्किंगची व्यवस्था केली जाते. मात्र, इतर दिवशी भाविक मंदिरालगतच्या वन विभागाच्या जागेत वाहने उभी करतात. या ठिकाणी नियमित सुरक्षा व्यवस्था, देखरेख किंवा सीसीटीव्हीची सुविधा नसल्याने चोरट्यांना आयती संधी मिळत असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांची गंभीर दखल घेत निझर्णेश्वर देवस्थान विश्वस्त मंडळाने पोलिस प्रशासन तसेच वन विभागाकडे मंदिर परिसरात नियमित गस्त वाढविण्याची मागणी केली आहे. तसेच भाविकांच्या वाहनांसाठी सुरक्षित व नियोजनबद्ध पार्किंगची व्यवस्था करावी आणि मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी मागणीही जोर धरत आहे.

श्रावण महिन्यात भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता मंदिर परिसरात पोलिसांची नियमित गस्त आणि वाहनतळावर देखरेख व्यवस्था वाढविणे गरजेचे आहे. अन्यथा चोरीच्या घटनांमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, भाविकांनीही वाहने सुरक्षित ठिकाणी उभी करून वाहन लॉक केल्याची खात्री करावी आणि परिसरात संशयास्पद हालचाल आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अंधारात वाळू तस्करीचा डाव फसला

## पोलिसांची धडक कारवाई, वाहनासह अर्धा ब्रास वाळू जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत विनापरवाना वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनावर संगमनेर तालुका पोलिसांनी धडक कारवाई केली. मालुंजे गावाच्या हद्दीत करण्यात आलेल्या या कारवाईत पोलिसांनी टाटा कंपनीचे वाहन आणि अर्धा ब्रास वाळू असा सुमारे ३ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ६ सप्टेंबर रोजी रात्री मालुंजे परिसरातून विनापरवाना वाळूची वाहतूक होत असल्याची माहिती संगमनेर तालुका पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक प्रवीण सालुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत संशयित वाहनाची तपासणी केली. यावेळी वाहनामध्ये कोणताही अधिकृत परवाना नसताना वाळूची वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी कारवाई करत सुमारे तीन लाख रुपये किमतीचे टाटा वाहन तसेच सात हजार रुपये किमतीची अर्धा ब्रास वाळू असा एकूण सुमारे ३ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला.

या प्रकरणी वाहनचालक अजित साहेबराव हांडे (वय ३०, रा. एटीएमपूर, ता. संगमनेर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, कारवाईदरम्यान घटनास्थळावर काही धारदार साहित्य तसेच चोरीसाठी वापरले जाणारे साहित्य आढळून आल्याने पोलिसांचा संशय बळावला असून, या साहित्याचा वापर नेमका कशासाठी केला जाणार होता, याबाबतही तपास सुरू आहे. अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीविरोधात संगमनेर तालुका पोलिसांनी सुरू केलेल्या कारवाईमुळे वाळू तस्करांचे धाबे दणाणले आहेत. रात्रीच्या वेळी होणाऱ्या अशा बेकायदा वाहतुकीवर पोलिसांकडून अधिक कठोर कारवाई केली जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस कर्मचारी बाबासाहेब शिरसाठ करीत आहेत.

# लोणी खुर्दमध्ये टोळक्याचा धुडगूस

## तरुणावर तलवार, चाकूने जीवघेणा हल्ला



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : लोणी खुर्द परिसरात ड्युटी संपवून घरी जात असलेल्या तरुणाला रस्त्यात अडवून अज्ञात हल्लेखोरांच्या टोळक्याने तलवार, चाकू तसेच लोखंडी रॉडने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नागेश शंकर लोट (वय ३८) हे शनिवारी रात्री सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास दुचाकीवरून घरी जात होते. पी.जी. कॉलेजजवळ काही जणांनी त्यांची दुचाकी अडवली. त्यानंतर काही काळातच हल्लेखोरांनी तलवार, चाकू आणि लोखंडी रॉडने नागेश लोट यांच्यावर अचानक हल्ला केला. या हल्ल्यात त्यांच्या डोक्यासह हात व पाठीवर गंभीर दुखापत झाली. रक्तबंबाळ अवस्थेत त्यांना तातडीने प्रवरा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

लोणी खुर्द येथील ब्राह्मणे वस्ती परिसरात घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. हल्ल्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, संबंधित हल्लेखोरांचा शोध घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# विदर्भात २४ तासांत पाच शेतकऱ्यांच्या आत्महत्या

## नापिकी, पावसाचा खंड आणि कर्जबाजारीपणाने घेतले बळी

अमरावती (वृत्तसंस्था)

विदर्भातील शेतकऱ्यांच्या संकटाचे विदारक चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. गेल्या चोवीस तासांत अमरावती, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यांत पाच शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. नापिकी, पावसाचा खंड, घटलेले पीक उत्पादन आणि डोक्यावरील कर्जाचा वाढता भार यामुळे पाच कुटुंबांवर काळाने घाला घातला आहे.



आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांमध्ये नामदेव रामचंद्र तायडे (७०, दर्याबाद), गजानन विनायक काळमेघ (७०, धामणगाव रेल्वे), दिनेश नारायण राऊत (४५, खेडपिंपरी, ता. नांदगाव खंडेश्वर), आनंदराव राजाराम खाडे (८५, कामरगाव) आणि विष्णू सदानंद मेटकर (२३, नगरवाडी, ता. महागाव) यांचा समावेश आहे.

नामदेव तायडे यांनी शेतीसाठी पीककर्ज घेतले होते. मात्र, काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने पिकांच्या उत्पन्नाची आशा धूसर झाली होती. शेतीसाठी पत्नीच्या नावावरही कर्ज घेतल्याने आर्थिक विवंचना अधिकच वाढली होती. हातातोंडाशी आलेल्या संसाराला आधार देणाऱ्या शेतीकडूनच आता उत्पन्नाची आशा उरली नसल्याने ते मानसिक तणावात होते.

गजानन काळमेघ यांच्यावरही नापिकी आणि कर्जबाजारीपणाचे संकट होते. आर्थिक अडचणींमुळे त्यांनी टोकाचे पाऊल उचलले. दिनेश राऊत यांच्याही आत्महत्येमागे कर्जबाजारीपणाची पार्श्वभूमी असल्याचे सांगितले जाते.

आनंदराव खाडे यांच्या मनात कर्जमाफीची मोठी अपेक्षा होती. मात्र, कर्जमाफीच्या यादीत नाव न आल्याची खंत, त्यातच पावसाने दिलेला मोठा खंड आणि शेतातील पिकांची झालेली दयनीय अवस्था यामुळे ते अस्वस्थ होते. कर्ज कसे फेडायचे, या चिंतेने त्यांना ग्रासले होते. दरम्यान, अवघ्या २३ वर्षांच्या विष्णू मेटकर या युवा शेतकऱ्याच्याही आत्महत्येने हळहळ व्यक्त होत आहे. घटलेले कापूस उत्पादन, अत्यल्प पाऊस आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे त्यांनी शनिवारी जीवन संपविले. विदर्भातील शेतकऱ्यांसाठी पाऊस म्हणजे केवळ पाणी नव्हे, तर त्यांच्या संपूर्ण वर्षाच्या संसाराची आणि भविष्याची आशा असते. मात्र, पावसाचा लहरीपणा, उत्पादनातील घट आणि वाढत्या कर्जाच्या ओझ्याने हीच आशा अनेकदा निराशेत बदलताना दिसत आहे. एकाच दिवसात पाच शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी शेतकरी संकटाची तीव्रता पुन्हा अधोरेखित केली असून, या कुटुंबांच्या दुःखासोबतच शेतीसमोरील वाढत्या आर्थिक संकटावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

### दिनविशेष

२०२२: नेताजी सुभाषचंद्र बोस — यांच्या २८ फूट उंच, इंडिया गेट, दिल्ली येथील पुतळ्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनावरण केले.

२००१: — लेगस्पिनर सुभाष गुप्ते आणि कर्णधार मन्सूर अलीखान ऊर्फ टायगर पतौडी यांची सी. के. नायडू पुरस्कारासाठी निवड.

२०००: — सिगरेट, तंबाखू व मद्याच्या जाहिराती दूरचित्रवाणी वाहिन्यांवर दाखविण्यास बंदी घालणारा कायदा अस्तित्वात.

१९९१: — मॅसेडोनिया युगोस्लाव्हिया पासून स्वतंत्र झाला.

१९६६: — स्टार ट्रेक या गाजलेल्या मालिकेचे प्रसारण सुरू झाले.

१९६२: — स्वातंत्र्य मिळालेल्या अल्जीरियाने नवीन संविधान अंगीकारले.

१९५४: साऊथ इस्ट एशिया ट्रिटी ऑर्गनायझेशन (SEATO) — स्थापना.

१९४४: — दुसरे महायुद्ध - लंडनवर पहिल्यांदा व्ही.२ बॉम्बचा हल्ला.

१९००: — अमेरिकेच्या गॅल्व्हेस्टन येथे आलेल्या हरिकेनमुळे ८,००० ठार.

### जन्म

१९३३: आशा भोसले — जगप्रसिद्ध पार्श्वगायिका — पद्म विभूषण, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, दादासाहेब फाळके पुरस्कार (निधन: १२ एप्रिल २०२६ )

१९२६: भूपेन हजारिका — भारतीय संगीतकार व गायक — भारतरत्न, पद्म विभूषण, पद्म भूषण, पद्मश्री, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, दादासाहेब फाळके पुरस्कार (निधन: ५ नोव्हेंबर २०११ )

१९२५: पीटर सेलर्स — इंग्लिश विनोदी अभिनेते आणि गायक (निधन: २४ जुलै १९८० )

१९१८: डेरेक हॅरोल्ड रिचर्ड बार्टन — ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ — नोबेल पुरस्कार

१९०१: हेन्ड्रिक व्हेरवोर्ड — दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान

१८८७: स्वामी शिवानंद सरस्वती — योगी व आध्यात्मिक गुरू (निधन: १४ जुलै १९६३ )

१८४८: व्हिक्टर मेयर — जर्मन रसायनशास्त्रज्ञ (निधन: ८ ऑगस्ट १८९७ )

१८४६: पॉल चेटर — भारतीय-हॉंगकॉंग उद्योजक व राजकारणी (निधन: २७ मे १९२६ )

१८३०: फ्रेडरिक मिस्त्राल — नोबेल पारितोषिक विजेते फ्रेंच कवी

१६४७: जॉन शेफिल्ड — बकिंगहॅम आणि नॉर्मनबीचा पहिले ड्यूक, इंग्रजी कवी आणि राजकारणी, कौन्सिलचे लॉर्ड अध्यक्ष (निधन: २४ फेब्रुवारी १७२१ )

### मृत्यू

२०२२: कमल नारायण सिंग — भारताचे २२वे सरन्यायाधीश (जन्म: १३ डिसेंबर १९२६ )

२०२२: एलिझाबेथ (दुसरी) — इंग्लंडची राणी (जन्म: २१ एप्रिल १९२६ )

२०१०: मुरली — तामिळ अभिनेते (जन्म: १९ मे १९६४ )

१९९७: कमला सोहोनी — पहिल्या भारतीय महिला शास्त्रज्ञ (जन्म: १८ जून १९११ )

१९९१: वामन कांत — भारतीय कवी (जन्म: ६ ऑक्टोबर १९१३ )

१९८२: शेख अब्दुल्ला — जम्मू-कश्मीरचे राजकिय नेते (जन्म: ५ डिसेंबर १९०५ )

१९८१: निसर्गदत्त महाराज — अद्वैत तत्त्वज्ञानी (जन्म: १७ एप्रिल १८९७ )

१९८१: हिदेकी युकावा — जर्मन भौतिकशास्त्रज्ञ — नोबेल पुरस्कार

१९८१: हिदेकी युकावा — जपानी भौतिकशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक — नोबेल पुरस्कार (जन्म: २३ जानेवारी १९०७ )

१९८०: विल्लर्ड लिब्बी — नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ

१९७०: पर्सी स्पेंसर — मायक्रोवेव्ह ओव्हनचे शोधक (जन्म: १९ जुलै १८९४ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**०८ सप्टेंबर**

## इंडिया गेटवर नेताजींचा भव्य पुतळा; राष्ट्रनायकाला मानाचा मुजरा!



भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी दिलेले योगदान, त्यांचे धाडस, नेतृत्व आणि राष्ट्रभक्ती आजही प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. नेताजींच्या या महान कार्याला अभिवादन म्हणून २०२२ मध्ये नवी दिल्लीतील इंडिया गेट परिसरात त्यांचा भव्य पुतळा उभारण्यात आला.८ सप्टेंबर २०२२ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते इंडिया गेटजवळ नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या २८ फूट उंच पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. याच दिवशी राजपथचे नामकरण 'कर्तव्य पथ' करण्यात आले. नेताजींचा पुतळा ज्या ठिकाणी उभारण्यात आला, त्याच ठिकाणी २३ जानेवारी २०२२ रोजी त्यांच्या १२५व्या जयंतीनिमित्त तात्पुरता होलोग्राम पुतळा प्रदर्शित करण्यात आला होता.हा पुतळा काळ्या ग्रॅनाइट दगडापासून तयार करण्यात आला आहे. विशेष म्हणजे तो एका २८० मेट्रिक टन वजनाच्या अखंड ग्रॅनाइट शिळेतून कोरण्यात आला. सुमारे २६ हजार मनुष्य-तासांच्या मेहनतीनंतर या शिळेला नेताजींच्या भव्य पुतळ्याचे स्वरूप देण्यात आले. अंतिम पुतळ्याचे वजन सुमारे ६५ मेट्रिक टन आहे. प्रसिद्ध शिल्पकार अरुण योगीराज यांच्या नेतृत्वाखाली हा पुतळा साकारण्यात आला. पारंपरिक शिल्पकलेच्या पद्धतींसोबत आधुनिक साधनांचा वापर करण्यात आला.नेताजी सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील असामान्य व्यक्तिमत्त्व होते. 'आझाद हिंद फौज'च्या माध्यमातून त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र संघर्ष उभारला. 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आज़ादी दूंगा' हा त्यांचा संदेश भारतीय तरुणांमध्ये राष्ट्रभक्तीची ज्वाला निर्माण करणारा ठरला. त्यांच्या नेतृत्वाखाली आझाद हिंद सरकारची स्थापना झाली आणि भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचला.इंडिया गेटजवळील पुतळ्याचे अनावरण हे केवळ एका महान स्वातंत्र्यसैनिकाच्या स्मृतीला अभिवादन नव्हते, तर देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचे स्मरण करून देणारा ऐतिहासिक प्रसंग होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या पुतळ्याला नेताजींच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाला योग्य श्रद्धांजली असल्याचे म्हटले. तसेच नेताजींची ऊर्जा आणि विचार देशाला पुढे जाण्यास प्रेरणा देतील, असा विश्वास व्यक्त केला.'कर्तव्य पथ' आणि नेताजींच्या पुतळ्याच्या अनावरणाचा कार्यक्रम 'आझादी का अमृत महोत्सव' या व्यापक राष्ट्रीय उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर झाला. वसाहतवादी मानसिकतेच्या प्रतीकांपासून मुक्त होऊन भारतीय इतिहास, परंपरा आणि स्वातंत्र्यवीरांना योग्य स्थान देण्याचा संदेश या कार्यक्रमातून अधोरेखित करण्यात आला.

# सुरांची 'आशा' आजही रसिकांच्या मनात अजरामर ! जन्मदिन विशेष

भारतीय संगीतविश्वात आपल्या बहुरंगी आणि वैशिष्ट्यपूर्ण आवाजाने तब्बल आठ दशके अधिराज्य गाजवणाऱ्या आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगलीजवळील गोवेर येथे झाला. त्यांचे मूळ नाव आशा मंगेशकर. प्रसिद्ध गायक आणि रंगभूमी कलाकार पंडित दीनानाथ मंगेशकर यांच्या त्या कन्या. संगीताचा वारसा लाभलेल्या या कुटुंबात लहानपणापासूनच त्यांच्यावर शास्त्रीय संगीताचे संस्कार झाले.वडिलांचे निधन झाल्यानंतर कुटुंबाची जबाबदारी लहान वयातच त्यांच्या खांद्यावर आली. अवघ्या दहाव्या वर्षी त्यांनी गायनाला सुरुवात केली. १९४३ मध्ये मराठी चित्रपटासाठी त्यांनी पहिल्यांदा व्यावसायिक गाणे गायले. पुढे हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश करत त्यांनी पार्श्वगायिका म्हणून आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी अथक संघर्ष



केला.सुरुवातीच्या काळात त्यांना मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागले. मात्र आपल्या आवाजातील चपळता, भावपूर्णता आणि विविध प्रकारच्या संगीताशी जुळवून घेण्याची क्षमता यामुळे त्यांनी हळूहळू संगीतविश्वात वेगळे स्थान निर्माण केले. प्रेमगीते, गझल, भक्तिगीते, लोकगीते, शास्त्रीय संगीत, पॉप आणि नृत्यप्रधान गाणी अशा विविध शैलींमध्ये त्यांनी प्रभावीपणे गायन केले.'पिया तू अब तो आजा', 'दम मारो दम', 'इन आँखों की मस्ती' यांसारख्या गाण्यांनी त्यांच्या आवाजाला देशभर लोकप्रियता मिळवून दिली. संगीतकार आर. डी. बर्मन यांच्यासोबतची त्यांची संगीतसाधना विशेष गाजली. त्यांच्या आवाजातील ऊर्जा आणि प्रयोगशीलतेमुळे हिंदी चित्रपटसंगीताला नवा आयाम मिळाला.आशा भोसले यांनी केवळ हिंदीतच नव्हे, तर मराठी, बंगाली, तमिळ, गुजराती आणि अन्य अनेक भारतीय भाषांमध्ये हजारो गाणी गायली. त्यांच्या कारकिर्दीत सुमारे १२ हजार गाण्यांची नोंद आहे. २०११ मध्ये गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये सर्वाधिक रेकॉर्डिंग केलेल्या कलाकारांपैकी एक म्हणून त्यांची नोंद झाली. आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांना मोठी ओळख मिळाली आणि त्यांना दोन वेळा ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळाले.त्यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीला अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळाले. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, दादासाहेब फाळके पुरस्कार (२०००) आणि पद्मविभूषण (२००८) या सन्मानांनी त्यांच्या कलेचा गौरव झाला.गायनाबरोबरच आशा भोसले यांनी अभिनय आणि व्यवसायाच्या क्षेत्रातही पाऊल ठेवले. त्यांच्या नावाने परदेशात रेस्टॉरंट व्यवसायही सुरू झाला. त्यामुळे त्या केवळ पार्श्वगायिका न राहता एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणूनही ओळखल्या गेल्या.१२ एप्रिल २०२६ रोजी मुंबईत वयाच्या ९२व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय संगीतविश्वातील एका विलक्षण पर्वाचा अंत झाला.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
• कमी वेदना, जलद बरे होणे
• लेझर व प्रगत तंत्रज्ञान
• अनुभवी जड्ढ डॉक्टरांचा सल्ला
• गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
।। ॐ नमः शिवाय ।। ।। श्री दत्तात्रेय नमः ।। ।। श्री विठ्ठल रुक्मिणी ।।
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर

# मराठा पतसंस्था सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन घडविणारी चळवळ - आ. अमोल खताळ

## संगमनेर शाखेच्या स्थलांतरित कार्यालयाचे उद्घाटन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मराठा पतसंस्था ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन घडविणारी चळवळ आहे. संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत कार्य सुरू ठेवल्यास बहुजन समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी फार काळ लागणार नाही, असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

मराठा पतसंस्था मर्या., अहिल्यानगर शाखा संगमनेरच्या स्थलांतरित कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक चेअरमन तथा मराठा सेवा संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. इंजि. विजयकुमार ठुबे होते. याप्रसंगी पतितपावन संघटनेचे प्रांताध्यक्ष एस. झेड देशमुख, डॉ. माणिकराव शेवाळे, संस्थेचे व्हा. चेअरमन, ज्ञानेश्वर अनभुले, वैभव लांडगे, इंजि. हरिश्चंद्र चकोर, शिवाजीराव फटांगरे, नंदिनीताई सोनाळे, मराठा सेवा संघाचे उत्तर जिल्हाध्यक्ष विवेक लव्हाट, जनरल मॅनेजर अशोक वारकड, शांताराम घुले, हांडे सर यांच्यासह अनेक मान्वर उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, सध्याच्या काळात पतसंस्था चालविणे अत्यंत जोखमीचे व आव्हानात्मक झाले आहे. अशा परिस्थितीतही मराठा पतसंस्था सक्षमपणे व पारदर्शकपणे काम करत आहे. संस्थेच्या आठ शाखांमध्ये संगमनेर शाखेचा व्यवसाय उल्लेखनीय आहे. शाखाध्यक्ष तथा संचालक काशिनाथ डोंगरे हे सहकार क्षेत्रातील कुशल नेतृत्व व उत्तम प्रशासक असून त्यांच्या कार्याचा संस्थेला मोठा लाभ होत आहे.

डॉ. विजयकुमार ठुबे यांनी मराठा पतसंस्था सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून काम करत असल्याचे सांगितले. सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजाला योग्य दिशा देण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी शिक्षण दिनानिमित्त प्रा. जयसिंग सहाणे, प्राचार्य एम. एम. फटांगरे, बी. आर. नागरे व प्राचार्य आर. बी. वाळे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच शासन सेवेत रुजू झालेले कर्मचारी, गुणवंत विद्यार्थी व संस्थेच्या यशात योगदान देणाऱ्या सभासदांचा गौरव करण्यात आला. युवावार्ताचे संपादक किसन भाऊ हासे यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. शिवाजीराव फटांगरे व अभिमन्यू पवार यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी, कर्मचारी व सभासद उपस्थित होते. आभार संचालक काशिनाथ डोंगरे यांनी मानले.

# संगमनेरमध्ये ३० फुटी दहीहंडीचा थरार

## हिंदू एकता आणि संस्कृतीच्या जागरासाठी तरुणाईचा उत्स्फूर्त सहभाग



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - विश्व हिंदू परिषदेच्या स्थापना दिनाचे औचित्य साधून संगमनेर शहरात विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि दुर्गावाहिनी-मातृशक्ती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला भव्य दहीहंडी महोत्सव हजारो नागरिकांच्या उपस्थितीत प्रचंड उत्साहात संपन्न झाला. थरारक कसरती, ढोल-ताशांचा गजर आणि १,११,१११ रुपयांच्या रोख बक्षिसांची लयलूट यामुळे हा सोहळा संगमनेरकरांसाठी अविस्मरणीय ठरला.

रविवारी सायंकाळी ६ वाजता संगमनेर बसस्थानकासमोरील दत्तमंदिर परिसरात महोत्सवाला दिमाखात सुरुवात झाली. 'छावा ढोल-ताशा-ध्वज पथका'च्या दणदणाटाने आणि फडकणाऱ्या भगव्या ध्वजांनी अवघा परिसर दुमदुमून गेला होता. त्यानंतर 'जाणता राजा प्रतिष्ठान'च्या वतीने सादर करण्यात आलेल्या लाठीकाठी, तलवारबाजी व शिवकालीन मर्दानी खेळांच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांच्या अंगावर शहारे आणले.

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरली ती म्हणजे जमिनीपासून तब्बल ३० फूट उंचीवर उभारण्यात आलेली १४ फुटांची देखणी बासरी आणि त्यावर टांगलेली मानाची दहीहंडी. ही हंडी फोडण्यासाठी विविध गोविंदा पथकांमध्ये चुरशीची स्पर्धा पाहायला मिळाली. संगमनेरच्या इतिहासात प्रथमच मुलींच्या गोविंदा पथकाने दिलेली शिस्तबद्ध व धाडसी सलामी या सोहळ्याचे खास वैशिष्ट्य ठरली.

अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत बजरंग दल साकूर मांडवे (लक्ष्मीमाता मित्र मंडळ) यांनी प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकावले, तर मानाच्या सलामीचे विशेष पारितोषिक बजरंग दल साकूर हिरेवाडी संघाने आपल्या नावे केले. विजेत्या गोविंदांचे मान्यवरांच्या हस्ते मंचावर जंगी स्वागत करून त्यांना रोख रक्कम व मानाची भव्य ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
• मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
• पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
• हेल्थ इंडिया इन्शुरन्स
• FHPL हेल्थ इन्शुरन्स
• इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
• बजाज आलियांज इन्शुरन्स
• एसबीआय जनरल इन्शुरन्स
• ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
• मेडसेव टीपीए प्रा.लि.
• जेनिन्स इंडिया टीपीए लि.
• ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
• टाटा एआयजी इन्शुरन्स
• रिलायन्स जनरल इन्शुरन्स
• मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
• चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
• नॅशनल इन्शुरन्स कं.
• न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
• निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
• युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
• स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
• दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
• एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
• युनायटेड हेल्थकेअर लि.
• Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
• मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
• एम.डी.इंडिया हेल्थकेअर
• विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
• पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

सोन्यांच्या दागिन्यांची मजुरी फक्त 7%
मुदत फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
PBM Jeweller's
श्रावण मास आणि रक्षाबंधन निमित्त
चांदी खरेदीवर 30% DISCOUNT
ऑफर फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
मे. पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर चावडी जवळ, संगमनेर
7599996999 / 8265036807
Follow us on:

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस
ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करू नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

मार्स युनिव्हर्स प्रायव्हेट लिमिटेड
टूर्स, ट्रॅव्हल्स आणि कॉर्पोरेट सर्व्हिसेस
तुमचे पाऊल मंगळावर ठेवण्यासाठी मार्स युनिव्हर्स सज्ज
प्रति व्यक्ती 59,000/-* (फुकेत, बँकॉक)
प्रति व्यक्ती 79,000/-* (व्हिएतनाम, सिंगापूर, बाली)
१ ला ग्रुप - 26 सप्टेंबर
२ रा ग्रुप - 1 ऑक्टोबर
३ रा ग्रुप - 10 ऑक्टोबर
संपर्क - किशोर सोनवणे 9309429705

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25